| पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.<br>करआकारणी व करसंकलन विभाग | |
|---|---|
| परिपत्रकाचे स्वरुप | दिव्यांग व्यक्तीचे नावावर असलेल्या मालमत्तेस सामान्य करात द्यावयाचे सवलतीबाबत |
| परिपत्रक क्रमांक | कर/मुख्य/९/कावि/३२८ /२०२२, दिनांक २० / १० /२०२२ |
| विषय : | दिव्यांग व्यक्तीचे नावावर असलेल्या मालमत्तेस सामान्य करात द्यावयाचे सवलतीबाबत |
| कोणाच्या कार्यवाहीसाठी | मालमत्ता कर आकारणी, तसेच वसूली करणारे सर्व अधिकारी / कर्मचारी |
| संदर्भ | १. कर व करेत्तर बाबींचे दरपत्रक सन २०२२-२०२३<br>२.परिपत्रक क्र.कर/मुख्य/५/कावि/ १८४ /२०१४,दिनांक १५/०५/२०१४<br>३. मा.प्रशासक यांचेकडील मा. महापालिका ठराव क्रमांक १८९, दि. ०४/१०/२०२२ |

**परिपत्रक,**

कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत शहरातील इमारत व जमिनीवर मालमत्ता कराची आकारणी व वसूलीची कार्यवाही करणेत येते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १४० नुसार मालमत्ता करामध्ये सूट / सवलत देणेबाबत तरतूद नमूद असून मालमत्ताधारकांनी विहित वेळेत कराचा भरणा करावा व मनपाचे उत्पन्न वाढीचे दृष्टीने विविध प्रोत्साहनपर करसवलती दिलेल्या आहेत.

संदर्भीय २ चे परिपत्रकान्वये ४०% किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असणा-या दिव्यांग व्यक्तींचे (अंध, दिव्यांग, मतिमंद, कर्णबधिर व मूकबधिर इ.) नावांवर असलेल्या मालमत्तेस आर्थिक वर्षातील चालू मागणीतील सामान्य करात ५०% सवलत देणेत येते. सदर सवलतीचा लाभ संबंधित मालमत्ताधारकास घ्यावयाचा असल्यास ३० जून पूर्वी सवलतीची रक्कम वगळता थकबाकीसह संपूर्ण रक्कम भरणे आवश्यक आहे. तथापि दिव्यांग नागरिकांची सदर सवलतीचा निरंतर लाभ देणेबाबत वर्षभरात केव्हाही घेता यावा ही मागणी विचारात घेऊन संदर्भ क्र.३ चे मंजूर ठरावाचे अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश निर्गत करणेत येत आहे.

मालमत्ता कर आकारणी रजिस्टरला नोंद असलेल्या जी मालमत्ता 40% किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असणा-या दिव्यांग व्यक्तींचे (अंध, दिव्यांग, मतिमंद, कर्णबधिर व मूकबधिर इ.) नावावर आहे. अशा महापालिका हद्दीतील त्यांचे नावे असलेल्या कोणत्याही एका मालमत्तेस आर्थिक वर्षातील चालू मागणीतील सामान्य करात 50% सवलत देणेत येते. सदर सवलतीचा लाभ संबंधित मालमत्ताधारकास घ्यावयाचा असल्यास 30 जून पूर्वी सवलतीची रक्कम वगळता थकबाकीसह संपूर्ण रक्कम भरणे आवश्यक असे धोरण आहे. त्यामध्ये सुधारणा करणेत येऊन सदर सवलतीचा लाभ संबंधित मालमत्ताधारकास निरंतर म्हणजेच चालू आर्थिक वर्षात केव्हाही संपूर्ण मालमत्ता कराचा भरणा केलेस लाभ देणेत यावा. सदर धोरण चालू आर्थिक वर्ष सन 2022-2023 पासून अंमलात राहिल. उर्वरित कार्यपद्धती यापूर्वीच्या धोरण / परिपत्रकानुसार राहिल.

(शेखर सिंह)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८

प्रति – सर्व करसंकलन विभागीय कार्यालय

प्रत - १. सर्व विभाग

२. माहिती व जनसंपर्क विभाग – सदर आदेशास व्यापक प्रसिद्धी देणेत यावी.

३. माहिती व तंत्रज्ञान विभाग / TECH – 9

२/- परिपत्रकामध्ये नमूद केलेनुसार संगणक आज्ञावलीमध्ये योग्य ते बदल करावेत.